जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंडे

सोमवार दि.१७ जून २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com




# ताईंना पाहताच वायभासे कुटुंबियांचा आक्रोश : पंकजा मुंडेंनाही अश्रु अनावर

## लोकसभेतील पराभवामुळे पोपट वायभासे या युवकाने केली होती आत्महत्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील चिंचेवाडी येथील पोपट वायभासे या युवकांने पंकजा मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा धक्का सहन न झाल्याने आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत,दिल्लीतील शपथविधी सोहळा आणि पक्षाच्या बैठकांना उपस्थित राहिल्यानंतर पंकजा मुंडे बीडमध्ये दाखल होताच, त्यांनी आत्महत्या केलेल्या पीडित कुटुंबियांची आज रविवारी भेट घेतली.यावेळी पंकजा मुंडे यांना देखील अश्रु आवरणं शक्य झाले नाही. शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करताना पंकजा यांच्याही अश्रूचा बांध फुटला.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत बीड लोकसभा मतदारसंघात भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा ६ हजार मतांनी पराभव झाला. त्यांच्या पराभवाचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात उमटले असून शिरुर,पाथर्डी, परळीसह अनेक ठिकाणी बंदही पुकारण्यात आला होता.तर जिल्ह्यात दोन युवकांनी पराभव जिव्हारी लाऊन घेत आत्महत्या केली होती. बीड नगर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या चिंचेवाडी येथील युवक पोपट वायभासे यांनी पराभवाचा धक्का सहन न झाल्याने आत्महत्या केली होती. त्यानंतर, आज पंकजा मुंडे यांनी वायभासे यांच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. मात्र, घरातील शोकाकुल वातावरण आणि पंकजा मुंडेंना पाहून कुटुंबातील सदस्यांच्या अश्रूचा बांध फुटला.

त्यावेळी, पंकजा मुंडेंनाही आपले अश्रू रोखणे अशक्य झाले. आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. यावेळी आ सुरेश धस , माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या सह संपूर्ण गाव गहिवरून गेल्याचे दिसून आले.

भावांनो ! राजकारणात हार अन जित चालूच असते खचून न जाता नव्या जोमाने कामाला लागले पाहिजे, त्यामुळे एखाद्या नेत्यावर इतकं पण प्रेम करू नका की,आपल्या नेत्यांच्या बाबतीत एखादी घटना घडली तर आत्महत्या सारख टोकाचे पाऊल उचलावे लागेल. त्यामुळे आपल्या कुटुंबातील सर्वांचा विचार करा आपल्या लेकराबाळाचा विचार करा, आईवडिलांचा विचार करा त्यांचा आधार जर हरपला तर त्यांच्याकडे कोण पाहिल? अशी भावनिक साद घातली.



# विधानसभा संपर्क प्रमुखांनी घेतला कंधार-लोहा विधानसभेचा आढावा

## आगामी निवडणुकीसाठी सतर्क राहण्याचा दिला कानमंत्र..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अपेक्षेप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आले आहेत.त्याच धर्तीवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष कंधार-लोहा विधानसभेवर आपल्या पक्षाला उमेदवारी मिळावी यासाठी दावा करत आहे.याच अनुषंगाने शिवसेनेचे कंधार लोहा विधानसभा संपर्क प्रमुख.आशिष आसगावकर यांनी दि.१५जुन रोजी कंधार येथे शिवसेनेच्या सिंहगड जनसंपर्क कार्यालय कंधार. येथे शिवसैनिकाची बैठक घेऊन,आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीची आढावा बैठक घेतली.

लातूर लोकसभा मतदार संघात कंधार-लोहा विधानसभेचा समावेश करण्यात आलेला असून.लातूर लोकसभेला महाविकास आघाडीचे डॉ.शिवाजी काळगे हे मताधिक्याने निवडून आल्याने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यां बरोबरच शिवसैनिकात नवचैतन्य निर्माण झाले आहे.आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेचे विधानसभा संपर्कप्रमुख आशिष आसगावकर कंधार येथे शिवसैनिकांसोबत चर्चा करून,निवडणुकीच्या पूर्वतयारीची आढावा बैठक घेतली.तालुक्यातील सर्व उप-तालुकाप्रमुख,सर्कल प्रमुख, गणप्रमुख, बूथ प्रमुख यांच्या नेमणुका झाल्यात की नाही. यांचा तपशील घेतला. विधानसभेच्या निवडणुकीसाठी कोण कोण उमेदवार इच्छुक आहेत, असल्यास त्यांचा जनसंपर्क कसा आहे,गाव तिथे शिवसेना आणि शाखाप्रमुख नियुक्त झाले आहेत का.अशा विविध मुद्द्यावर शिवसैनिकासोबत चर्चा करुन आढावा घेतला. यावेळी शिवसैनिकांनी प्रत्येक विषयावर आपले मत मांडून. लेखी अहवाल विधानसभा संपर्कप्रमुख आशिष गावकर यांच्याकडे सादर केला.यावेळी विधानसभा संघटक गणेश कुंटेवार,तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव,माजी सभापती तालुका संघटक पंडित देवकांबळे,पंचायत समिती सदस्य तालुका समन्वयक उत्तम चव्हाण,किसान सेना तालुकाप्रमुख शिवाजी कदम,उपतालुकाप्रमुख दादाराव शिंदे, जेष्ठ शिवसैनिक आत्माराम पाटील लाडेकर,शिवदूत नामदेव गांगतिरे, युवासेनेचे निरंजन वाघमारे, राहुल शिंदे,संतोष पाटील घोरबांड, सर्कल प्रमूख रोहीदास शिरढोने, रमाकांत देवणे, अच्युत मेटकर,जीएम पवळे,जळबा पाटील शिंदे, केदारनाथ देवकांबळे, निरंजन वाघमारे, बाबु पाटिल शिंदे,लक्ष्मण कटवाड,याबरोबर अनेक शिवसैनिक उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांसाठी आंनदाची बातमी

# एसटी महामंडळाचे मोफत पास आता थेट शाळा-कॉलेजमध्येच मिळणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी अत्यंत आंनदाची बातमी समोर आली आहे. आता एसटी महामंडळाचे पास काढण्यासाठी विद्यार्थ्यांना रांगेत थांबवण्याची आवश्यकता नाही. तर त्यांचे पासेस थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळाला सूचना देण्यात आल्या आहेत. एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला तशा सूचना दिल्या असल्याची माहिती मिळाली आहे.नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा शनिवारपासूनच सुरू झाल्या आहेत. त्यामुळे दूरवर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी बसने प्रवास करावा लागतो. त्यासाठी त्यांना सवलत देखील दिली जाते. मात्र, विद्यार्थ्यांना पास काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागते. विद्यार्थ्यांना होणारा हा त्रास थांबवण्यासाठी एसटी महामंडळाच्या वतीने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६% इतकी सवलत दिली जाते. तर केवळ ३३% रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहावे लागत होते. विद्यार्थिनींना होणारी गैरसाय टाळण्यासाठी एसटी महामंडळाने हा निर्णय घेतला आहे.

# आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी घाटा मध्ये सापडला अज्ञात महिलेचा मृतदेह

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पिंपरी घाटा शिवारात घाटामध्ये एका अज्ञात महिलेचा मृतदेह सापल्याची घटना दि.१५ जुन रोजी सकाळी ठिक आकाराच्या दरम्यान घडली एक प्रवासी रोड साईटवर लघुशंका करण्यासाठी थांबला असता त्या व्यक्तीला हा मृतदेह दिसुन आला असता त्याने म्हसोबावाडी चौकातील गावकऱ्यांना फोन करुन सारा प्रकार सांगितला अन् गावकऱ्यांनी स्थानिक पोलिस ठाण्या हद्दीतील आढळलेला घटनास्थळी भेट दिली अंभोरा पोलिस स्टेशनचे सपोनि मंगेश साळवे,उपनिरीक्षक भडके, पो.कॉ.केदार,पो.कॉ तांदळे, पालवे मॅडम यांच्या समवेत त्या मृतदेहाचा पंचनामा केला व शवविच्छेदनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सुलेमान देवळा येथे पाठवण्यात आले सदरील घटनेचा महिलाचे वर्णन उजव्या हाताच्या कोपरापुढे गोंधलेले, उजव्या हाताचे करंगळी जवळील बोट आखुड असलेले, डाव्या हातात लाल-सफेद रंगाची कचकडीची एक बांगडी, डाव्या हाताच्या करंगळी जवळील बोटात एक सफेद धातूची अंगठी, नाकात बारीक मुरनी, डोक्याचे केस सफेद काळे मध्यम लांब,अंगात गुलाबी रंगाचा व त्यावर आकाशी पिवळे रंगाचे फुले असलेला




गाऊन, तसेच पिवळ्या रंगाचा परकर परिधान केलेला.

ठिकाण- मयताचे प्रेत मौजे पिंप्री घाटा,ता.आष्टी,जि.बीड येथून गेलेल्या नगर - बीड हायवेच्या कडेला घाटात मिळून आलेले आहे.

(अंदाजे दोन दिवसापूर्वीचे प्रेत असावे.)

कृपया सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, वरील वर्णाचे अनोळखी प्रेत आपले ओळखीचे अथवा आपल्या परिसरातील असल्यास तात्काळ अंभोरा पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा.

मंगेश साळवे
प्रभारी अधिकारी
अंभोरा पोलीस स्टेशन
सपर्क मोबाईल क्रमांक
१. ९६२३८९७१०६
२. ८८३०८५६०९७




## चारोळी

एक धीराचा शब्द
आयुष्य बदलून टाकतो
विचार बीज पेरत
प्रगतीचा मार्ग निघतो.

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

# नीट घोटाळ्यांचे कनेक्शनही गुजरातसोबत हा योगायोग कसा?:जितेंद्र आव्हाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

नीट परिषदेतील गोंधळाबाबत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केंद्रातील भाजप सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात पेपर फोडल्याची कबुली दिलेली असताना सरकार मूग गिळून गप्प बसले असल्याचा आरोप आव्हाड यांनी केला आहे. इतकेच नाही तर नीट घोटाळ्यांचे कनेक्शनही गुजरातसोबत हा योगायोग कसा? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.या संदर्भात जितेंद्र आव्हाड यांनी एका पोस्टच्या माध्यमातून भाजप सरकावर निशाणा साधला आहे. यामध्ये त्यांनी पेपरफुटीबाबत जितका हलगर्जीपणा सरकार दाखवतंय त्यावरून ते या विषयाबाबत किती गंभीर आहे हे दिसत असल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे. जबाबदाऱ्यांपासून पळून जाणे ही पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या मंत्र्यांची जुनी सवय असल्याचा आरोपही आव्हाड यांनी केला आहे.

# जागतिक पितृ दिन

सोळा जून दिस । आहे पितृ दिन ।
करावा सन्मान । वडिलांचा ।। १ ।।

वडील दिनाच्या । हार्दिक शुभेच्छा ।
मनस्वी सदिच्छा । सर्वांनाच ।। २ ।।

माता आणि पिता । प्रथम हे गुरू ।
सुसंस्कार सुरू । बालपणी ।। ३ ।।

जागृत वडील । आदर्श पालक ।
घडती बालक । संस्कारांनी ।। ४ ।।

सुनं सुनं वाटे । आई विना घरं।
वाटते अधुरं । बाबांविना ।। ५ ।।

माता आणि पिता । प्रथम हे गुरू ।
सुसंस्कार सुरू । बालपणी ।। ६ ।।

माता नि पित्यांच्या । अनुकरणाचे ।
धडे जीवनाचे । गृहातच ।। ७ ।।

अपेक्षा नसावी । घडता बालक ।
सूज्ञ तो पालक । जीवनात ।। ८ ।।

असे मंदबुद्धी । विकलांग असे ।
संगोपन असे । समानच ।। ९ ।।

सहवास असे । वडिलांचा बाळा ।
सुगंधाचा वाळा । संसारात ।। १० ।।

आनंदी आनंद । असे कुटुंबात ।
मुलं घडतात । जीवनात ।। ११ ।।

मातेच्या रूपात । प्रेमळ माऊली ।
प्रेमळ सावली । बाबांचीच ।। १२ ।।

मनी काय असे । ओळखते आई ।
भविष्याची जाण। बाबांनाच ।। १३ ।।

ठेचाळता पाय । आई आठवण ।
वादळाचा क्षण । बा- स्मरण ।। १४ ।।

शिक्षणा सोबत । देई सुसंस्कार ।
देई सुविचार । मायबाप ।। १५

आई - बाबांसाठी । मुलांनी मुलींनी ।
मातृ-पितृ गाणी । गात जावी ।। १६ ।।

**संत कबीर कविराज**
**राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त**
**अभंगकार**
**- प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**रुक्मिणी नगर, अमरावती.**
**भ्रमणध्वनी : ८०८७७४८६०९**




# जिजामाता

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । एक मातृतिर्थ ।
जीवनाचा अर्थ । कळू लागे ।। १ ।।

शंभू शिवबांची । वासल्याची मूर्ती ।
गाऊ सर्व कीर्ती । जिजाऊंची ।। २ ।।

राजघराण्याची । राजमाता जिजा ।
रूजविले बिजा । अंतरंगी ।। ३ ।।

स्मृतींना मूल्यांना । जपावे आपण ।
सोडून मी पण । सर्वार्थाने ।। ४ ।।

त्याग समर्पण । भाव मूर्तिमंत ।
कार्य जातिवंत । जिजामाता ।। ५ ।।

राजमाता एक । स्वराज्य जननी ।
कर्माची कहाणी । वर्णू किती ।। ६ ।।

स्वराज्य रक्षण । नीती अधिष्ठान ।
खरे प्रतिष्ठान । जिजामाता ।। ७ ।।

जिजाऊ मातेला । आज स्मृतिदिनी ।
वंदन करांनी । कोटी कोटी ।। ८ ।।

**संत कबीर कविराज**
**राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त**
**अभंगकार**
**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**रुक्मिणी नगर,अमरावती**



# अवकळलेल्या मराठी रंगभूमीचा लोकाश्रय!

लोकनेता न्यूज नेटवर्क

आचार्य अत्रे यांचा जन्म दि.१३ ऑगस्ट १८९८ रोजी पुणे जिल्ह्यातील सासवड जवळील कोडित खुर्द या गावी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील लिपिक होते आणि काही काळासाठी सासवड नगरपालिकेचे सचिव होते आणि त्यांचे काका एमईएस वाघिरे हायस्कूल सासवड येथे शिक्षक होते. सासवडच्या एमईएस वाघिरे हायस्कूलमधून त्यांनी प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. सन १९१९मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी मॅट्रिक पूर्ण केले. पुणे विद्यापीठातून त्यांनी कला शाखेची पदवी पूर्ण केली. पदवीनंतर अत्रे यांनी शाळेत शिक्षक म्हणून काम केले. अत्रे यांनी सन १९२८मध्ये लंडन विद्यापीठातून टीडी. (शिक्षक पदविका) केले. भारतात परत येण्यापूर्वी त्यांनी सिरिल बर्ट यांच्या हाताखाली प्रायोगिक मानसशास्त्राचा अभ्यास केला आणि हॅरो येथे अध्यापन केले.

ते पुढे मराठीतील अष्टपैलू साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रपटनिर्माते-दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, वक्ते आणि नेते ठरले. सासवड जिल्हा पुणे या गावी जन्मलेले अत्रे सासवड, पुणे, मुबंई व लंडन या ठिकाणी बीए, बीटी, टीडी. पर्यंत शिक्षण घेऊन होते. नंतर पुण्यातील कँप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत प्रथम शिक्षक व पुढे प्राचार्य म्हणून काम केले. तेथे असतानाच राजा धनराज गिरजी हायस्कूल-१९२७ व मुलींचे आगरकर हायस्कूल-१९३४ या शाळांच्या संस्थापनेत भाग घेतला. पुण्याच्या नगरपालिकेचे काही काळ ते सदस्य होते. सन १९३३पासून नाट्यक्षेत्रात व पुढे चित्रपटसृष्टीतही त्यांनी प्रवेश केला. सन १९३९नंतर मुंबईला स्थलांतर झाले. सन १९४०मध्ये सुरू केलेल्या साप्ताहिक नवयुगपासून अखेरपर्यंत वृत्तपत्रक्षेत्रातच ते राहिले. याचबरोबरच अत्रे थिएटर्स या नाट्यसंस्थेमार्फत रंगभूमीशीही त्यांचे व्यावसायिक संबंध होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांनी आपली वाणी व लेखणी यांद्वारे मोठे कार्य केले. प्रथम मकरंद व नंतर केशवकुमार या टोपणनावांनी काव्यलेखन. झेंडूची फुले-१९२५ हा त्यांच्या विनोदी व विबंडन-कवितांचा संग्रह होता. त्यात जुन्या वळणाचे विशेषत: रविकिरणमंडळाचे कवी व त्यांच्या कविता यांतील लकबांचे व वैगुण्यांचे विडंबन केलेले आहे. आधुनिक मराठीतील विडंबनकाव्याची परंपरा उपर्युक्त काव्यसंग्रहापासून मानण्यात येते. बालकवी व गोविंदाग्रज यांच्या कवितांचा ठळक परिणाम दाखविणारी त्यांची अन्य स्फुट कविता गीतगंगा-१९३५ या संग्रहात आहे. अत्र्यांच्या नाट्यलेखनाचा पहिला कालखंड १९३३ ते १९६० हा होय. मराठी रंगभूमीचा हा अवनतकाळ होता. संगीत नाटके व नाटककार तसेच गायक नटवर्ग यांची परंपरा खंडित व निष्प्रभ झाली होती. चित्रपटसृष्टीचा वाढता प्रभाव मराठी रंगभूमीस अनिष्ट ठरला होता. आर्थिक मंदीमुळेही रंगभूमीचा लोकाश्रय कमी होत होता. नाट्यविषयक अभिरुचीतही परिवर्तन घडत होते. अशा काळात अत्र्यांची मुख्यत: प्रहसनात्मक व विनोदी नाट्यदृष्टी आणि अवनत मराठी रंगभूमीच्या तात्कालिक गरजा यांचा चपखल मेळ बसला. विशेष यशस्वी झालेल्या त्यांच्या एकूण बारा नाटकांपैकी दहा नाटके प्रहसनात्मक व विनोदप्रचुर आहेत. गुरुस्थानी मानलेले गडकरी व फ्रेंच प्रहसनकार मोल्येर यांचा प्रभाव त्यांच्या नाटकांवर पडलेला दिसतो. त्या नाटकांत सामाजिक दोषदर्शन व दंभस्फोट आहेत पण उपहास, उपरोध, विडंबन व अतिशयोक्ती या विनोदसाधनांच्या द्वारा ते प्रकट केले आहेत. साष्टांग नमस्कार-१९३३, भ्रमाचा भोपळा-१९३५ व लग्नाची बेडी-१९३६ ही त्यांपैकी काही लोकप्रिय नाटके होत. घराबाहेर-१९३४ व उद्याचा संसार-१९३६ ही त्यांची विशेष गंभीर व सामाजिक समस्यात्मक नाटके आहेत. त्या काळात विशेष अनुकरणीय ठरलेल्या इब्सेन या नॉर्वेजियन नाटककाराचा संस्कार वरील दोन नाटकांवर झाल्याचे जाणवते. अवकळलेल्या मराठी रंगभूमीचा लोकाश्रय टिकवून ठेवण्यात अत्र्यांची नाटके यशस्वी झाली. १९६० नंतरच्या दुसऱ्या कालखंडातील त्यांची महत्त्वाची नाटके म्हणजे तो मी नव्हेच-१९६२ व डॉक्टर-१९६७ ही होत. सत्यसृष्टीतील खळबळजनक घटनांवर ती आधारलेली आहेत. तंत्रदृष्ट्या प्रगत मराठी रंगभूमीचे दर्शनही त्यांत घडते. वर्तमानकालीन अशा नाट्यात्म घटनांची अभिज्ञता अत्र्यांना स्वभावत: होती. या कालखंडातील अत्र्यांची लोकप्रिय नाटके पूर्वकालीन नाटकांच्या तुलनेने अधिक प्रत्यक्षदर्शी आहेत. मराठी रंगभूमीवरील अखंड प्रयोगशीलतेच्या व तीव्र स्पर्धेच्या या कालखंडातही त्यांची सर्वच नाटके लोकप्रिय ठरली.

त्यांचे कथात्मक साहित्य त्यांच्या विडंबनकाव्यासारखे वा नाटकांसारखे प्रभावी ठरले नाही. विनोदी कथा लिहूनही विडंबनकाव्याप्रमाणे अशा कथांची परंपरा मात्र त्यांना निर्माण करता आली नाही. त्यांचे चांगले कथात्मक साहित्य काहीसे गंभीर व वास्तवपूर्णच आहे. त्यात चांगुणा-१९५४ ही कादंबरी व बत्ताशी व इतर कथा-१९५४ यांचा समावेश होतो. विविध विषयांवर अत्र्यांनी केलेल्या लेखनात लहानमोठी चरित्रे, व्यक्तिदर्शने, मृत्यूलेख, प्रवासवर्णने, वृत्तपत्रीय लेख, साहित्यविषयक लेख आणि भाषणे, शालेय पाठ्यपुस्तके इत्यादींचा समावेश होतो. महात्मा फुले-१९५८, पंडित जवाहरलाल नेहरूंवरील सूर्यास्त-१९६४, समाधीवरील अश्रू-१९५६, केल्याने देशाटन-१९६१, अत्रे उवाच-१९३७ ललित वाङ्मय-१९४४, हशा आणि टाळ्या-१९५८ ही त्यांची काही उल्लेखनीय पुस्तके होत. त्यांच्या नवयुग वाचनमाला-१९३७ व सुभाष वाचनमाला-१९६२ यांनी-विशेषत: पहिल्या मालेने-मराठी भाषासाहित्यविषयक शालेय पाठ्यपुस्तकाचा मराठीत एक आदर्शच निर्माण केला. अप्रकाशित गडकरी-१९६२ हा त्यांनी संपादित केलेला ग्रंथ अभ्यसनीय आहे. मी कसा झालो?-१९५३ हे त्यांचे वाङ्मयीन आत्मशोधन होय. अत्र्यांनी आपले जीवननाट्य अत्यंत रसाळ व भावपूर्ण शैलीने प्रस्तुत पुस्तकात निवेदन केले असल्याने मराठी आत्मचरित्रपर साहित्यात त्यास विशेष महत्वाचे स्थान आहे. कऱ्हेचे पाणी या पाच खंडांतील-१९६३, १९६४, १९६५, १९६७ व १९६८ विस्तृत आत्मचरित्रात आपली जीवनकथा त्यांनी सांगितली आहे.

अत्र्यांच्या स्वतंत्र वृत्तपत्रव्यवसायाचा आरंभ साप्ताहिक नवयुगपासून-१९४० ते १९६२ झाला. १९४३-१९४४ समीक्षक मासिकाच्या गडकरी विशेषांकाचे व दिवाळी अंकाचे संपादनही त्यांनी केले. १९४७-१९४८ या वर्षांत जयहिंद नावाचे एक सायंदैनिकही त्यांनी चालविले. तुकाराम-१९५४ नावाचे साप्ताहिकही त्यांनी काढले होते. सन १९५६मध्ये सुरू केलेल्या दैनिक मराठाचे ते अखेरपर्यंत संपादक होते. त्यांच्या वृत्तपत्रीय शैलीवर संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकरांचा फार मोठा परिणाम जाणवतो. मराठी चित्रपटसृष्टीत पटकथालेखक म्हणून व पुढे स्वतंत्र निर्माते म्हणून अत्र्यांनी महत्त्वाचे कार्य केले. धर्मवीर, प्रेमवीर, ब्रह्मचारी व ब्रँडीची बाटली हे त्यांचे काही लोकप्रिय चित्रपट होत. त्यांच्या श्यामची आई या चित्रपटास राष्ट्रपतींचे सुवर्णपदक-१९५४ व महात्मा फुले या चित्रपटास रौप्यपदक-१९५५ मिळाले. नाटकांप्रमाणेच अत्र्यांच्या चित्रपटांचा आरंभ विनोदाने झाला व परिणती गांभीर्यात झाली. त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा-१९५८ प्रसिद्ध झालेल्या आहेत.

त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा विकास संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात झाला. वक्तृत्व व वृत्तपत्र ही राजकीय कार्याची त्यांची प्रभावी साधने होती. लोकप्रिय वक्ते म्हणूनही अत्र्यांचा लौकिक होता. त्यांचे वक्तृत्व हशा व टाळ्या यांनी गाजत असे. प्रक्षोभक वादांसाठीही अत्रे प्रसिद्ध होते. भा.वि.वरेरकर, श्री.म.माटे, ना.सी.फडके, पु.भा.भावे वगैरे व्यक्तींशी झालेले त्यांचे तीव्र वाद महाराष्ट्रात गाजले होते. अत्र्यांचे व्यक्तिमत्व गतिमान होते. अशा व्यक्तिमत्वाची स्वाभाविक गरज म्हणूनच त्यांचे अनेकांगी कर्तृत्व निर्माण झाले. त्यांची विनोदबुद्धी त्यांच्या सर्व कर्तृत्वक्षेत्रांत आढळते. विनोदकार म्हणूनच ते अधिक लक्षात राहतात. त्यांची लेखनशैली त्यांच्या व्यक्तिमत्वाची निदर्शक असून तिच्यात एक प्रकारचा अस्सल मराठमोळेपणा जाणवतो. नाशिक येथे सन १९४२मध्ये भरलेल्या सत्ताविसाव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अडतिसावे नाट्यसंमेलन बेळगाव-१९५५, दहावे मराठी पत्रकार-संमेलन-१९५० आणि बडोदे, इंदूर व ग्वाल्हेर येथील प्रादेशिक साहित्यसंमेलने यांची अध्यक्षपदेही त्यांनी विभूषित केली होती. वरळी, मुंबई येथे ते दि.१३ जून १९६९ रोजी निधन पावले.

!! आचार्य अत्रे यांना त्यांच्या पावन पुण्यस्मरण निमित्त विनम्र अभिवादन !!

# ।। गुरूजी।।

## फरक पहिल्या गुरूजी आणि आताच्या गुरूजींचा

लोकनेता न्यूज नेटवर्क

साधंसं धोतर, नेहरू शर्ट, डोक्यावर टोपी... नेहरू शर्टच्या खिशात पॉकेट डायरी, साधंसं पेन... अशा व्यक्तिमत्त्वाचे गुरुजी दिसले की गावातली माणसं त्यांना आदरानं नमस्कार करायची.

कसे आहात गुरुजी?' वगैरे वास्तपुस्त व्हायची. पोरं गुरुजींना पाहून धूम पळायची. विटी-दांडू, गोट्या, रपाधपीचा कापडी चेंडू, गाडी गाडी करत फिरवले जात असलेले सायकलीचे जुने टायर अशा खेळांच्या साऱ्या जिनसा जागीच सोडून!

त्या वेळी सातवी पास असलं, की गुरुजी म्हणून नोकरी लागायची. काही शिक्षक तर कुग्राम म्हणावं अशा खेड्यात जाऊन शाळा सुरू करायचे. गुरुजींची उपजीविका गावावर अवलंबून असायची. नंतर जेमतेम पगार सुरू झाला. खर्च असा नव्हताच. अगदी गावात असलेला एखादा मोकळा वाडाही गुरुजींना मोकळ्या मनानं उघडून दिला जायचा.

सांज-सकाळी कुणाच्याही मळ्यातून हिरव्या पालेभाज्या यायच्या. गुरुजींच्या घराचा कोपरा कडधान्यांनी भरून जायचा. निरशा दुधाचा मोफत रतीब असायचा. गुरुजी ग्रामव्यवस्थेचे अविभाज्य घटक असायचे.

कुणाच्या घरी पत्र आलं, की त्या घराला गुरुजींची आठवण व्हायची. पोरगं विजार सावरत पळायचं आणि गुरुजींना घेऊन यायचं. तोपर्यंत घरातला बाप्या अंगणात गोधडी टाकायचा. कारभारीण चुलीत तुराट्या घालून चहाचं आधण ठेवायची. गुरुजी येऊन पत्र वाचायचे. थाळाभर चहा समोर यायचा. मग अंधार पडेपर्यंत शिवारगप्पा सुरू व्हायच्या. त्यातच जेवणाची वेळ व्हायची. गुरुजी उठू लागल्यावर बाप्याचा आग्रह सुरू व्हायचा. कारभारीण दाराच्या आतून पदर सावरत आदरानं म्हणायची : आता दोन घास खाऊनच जावा की गुरुजी!' ते 'नको नको' म्हणत असतानाच काठवटीत भाकरीची थपथप सुरू व्हायची कंदिलाच्या गढूळ प्रकाशात...

खरपूस पापुद्रा आलेली बाजरीची गरमागरम भाकरी, खापराच्या तवलीतलं झणझणीत कोरड्यास, लसूण, मीठ, लाल मिरची घालून पाट्यावर रगडलेला भेळा, गाडग्यात मुरलेलं खारट लोणचं... या अन्नाला मायेची चव असायची. तृप्त पोटानं गुरुजी उठायचे. झोपेनं पेंगुळलेल्या पोराच्या डोक्यावर हात फिरवायचे. बाप्या कंदील घेऊन उठत म्हणायचा: अंधार हाय... गरमासाचे किरकुडे निघत्यात... चला घरला सोडून येतो.' कंदिलाच्या मिणमिणत्या उजेडासारखं ते स्निग्ध प्रेम पाहून गुरुजी भारावून जायचे.

गावात मुलीला पाहायला पाहुणे येण्यापासून तिचं लग्न लागेपर्यंत गुरुजींची महत्त्वाची भूमिका असायची. दुखणं-पाखणं, अंत्यविधी, सणवार, प्रवचनं-कीर्तनं अशा प्रत्येक ठिकाणी सूत्र गुरुजींकडंच असायची. त्या काळी शाळा ही देवळात, एखाद्या मोकळ्या घरात, नाहीतर झाडाखाली भरायची. खोडाला खिळा ठोकून त्याला लाकडी फळा लटकवला जायचा. फळ्यावर पुसट उमटलेली अक्षरं विद्यार्थ्यांच्या मनावर मात्र गडदपणे उमटायची. गावभर पाढ्यांचा, बाराखडीचा आवाज घुमायचा.

नंतर पत्र्याच्या, कौलाच्या इमारती झाल्या. गुरुजींना शाळेच्या खर्चासाठी दोन रुपये सादिल' म्हणून मिळायचा. डुगूडुगू हलणारं लाकडी टेबल, लांब बाकडं, रेकॉर्ड ठेवायला लाकडाची मोठी पेटी... गुरुजी तीच पेटी खुर्ची म्हणून वापरायचे. पालक तर ठार अडाणी. पोरगं पहिलीत घालायचं तर जन्मतारीख माहीत नाही. मग मुलगा सहा वर्षांचा झाला आहे किंवा कसं हे तपासण्यासाठी गुरुजी त्याचा एक हात डोक्यावरून विरुद्ध बाजूच्या कानाला लावायला सांगायचे. हात कानाला लागला तरच पहिलीत प्रवेश!

नावाची- आडनावाची अशीच बोंब असायची. शिंपी, लोहार, सुतार, कुंभार असे व्यवसाय असतील तर तेच आडनाव हजेरीवर लावलं जायचं. आईनं पोराचं नाव दगड्या सांगितलं तर ते तसंच लिहावं लागायचं. लिहिताना गुरुजींनी दगड्या'चा उच्चार दगडू' असा केला तर त्याची आई म्हणायची : दगड्याच लिवा. दगडू म्हणल्यावर त्यो भोकाड वाशितो'!

शाळेची घंटा म्हणजे रुळाचा तुटलेला तुकडा असायचा. घणघण असा ओळखीचा आवाज गावभर घुमायचा.वर्गात फरशी नसायची. साधी जमीन. आठवड्यातून एक दिवस वर्ग शेणानं सारवावा लागायचा. गुरुजींचा आदेश आल्यावर आम्ही विद्यार्थी शेण गोळा करायला निघायचो. नदीवरून बादल्या भरून आणण्याचं काम थोराड शरीराच्या मुलांकडं असायचं. तोपर्यंत मुली परकरांचे ओचे-कोचे खोवून सारवण्याच्या तयारीत वर्गाच्या चारही कोपऱ्यांत बसलेल्या असायच्या. एकंदर वर्ग सारवून घेणं हा आमच्यासाठी सोहळाच असायचा.

शाळा सुरू असताना काही पोरं गायब झाल्यावर ती पोरं कुठं गेली असतील ते गुरुजी अचूक ओळखायचे. शर्ट-विजार ओली असेल तर मासे धरायला ओढ्याला... करदोरा ओला असेल तर मुलगा नदीवर पोहून आलेला... हाता-पायांवर ओरखडे असतील तर बोरीच्या झाडावर चढून बोरं खाऊन आलेला... तोतरं बोलला तर बिबीची फुलं खाऊन आलेला... हाता-पायांवर मोठाल्या लाल रेषा असतील तर कुणाच्या तरी शेतात शिरून ऊस तोडून खाऊन आलेला... जीभ लालसर जांभळी असेल तर जांभळं खाऊन आलेला... बोटात बारीक काटे असतील तर सबरीची बोंडं खाऊन आलेला... तोंडाभोवती चिकटपणा असेल तर गुऱ्हाळात जाऊन गूळ खाऊन आलेला, हाता-पायांवर पांढुरका चिकटा असेल तर कुणाच्या तरी शेतात जाऊन हरभरा खाऊन आलेला... अशा निरनिराळ्या खुणांवरून गुरुजी विद्यार्थ्यांची चोरी नेमकी पकडायचे. गुरुजींनी बरोबर कसं ओळखलं म्हणून त्या वयात आम्हा विद्यार्थ्यांना अतोनात आश्चर्य वाटे.

शाळा अशा मजेत चालायच्या! आम्हाला खाकी चड्डी आणि पांढरा सदरा असायचा. अनेकांच्या चड्डीच्या मागच्या बाजूला कमी-जास्त मोठी असलेली आयताकृती ठिगळं असायची. सदऱ्याचा पुढचा भाग फाटलेला म्हणून ते फाटलेलं झाकण्यासाठी पुढून शर्टिंग आणि मागचं चड्डीचं ठिगळ झाकण्यासाठी सदऱ्याचा मागचा भाग शर्टिंग न करता तसाच राहू दिला जायचा. खतांच्या गोण्यांपासून दप्तराच्या पिशव्या शिवलेल्या असायच्या. त्या खतांच्या कंपनीचे आम्ही विद्यार्थी चालते-बोलते प्रचारक होतो म्हणा ना!

अडचणी होत्या... संकटं होती... पण शिक्षण मात्र सकस होतं. गुणवत्तापूर्ण होतं. मात्र, गुणवत्तेच्या मूल्यमापनासाठी तेव्हा खंडीभर साधनं नव्हती. डोक्यावर व्यवस्थेची जीवघेणी उतरंड नव्हती. गुरुजींवर विश्वास होता.

काळ बदलला. समाज बदलला. विद्यार्थी बदलले. गुरुजी बदलले. सारवणाच्या जमिनी जाऊन फरश्या आल्या. भिंती रंगल्या. शाळा मेकअप केल्यासारख्या सजल्या... देखण्या झाल्या!

संगणक आले. शाळा डिजिटल झाल्या. तंत्रज्ञानानं शिक्षण व्यापलं. गुरुजींच्या खिशात डायरीऐवजी मोबाईल आले. प्रोजेक्टरवर अभ्यासक्रम आला. साऱ्याच कवितांना एकच सरकारी चाल पाहून मुलं बावरली. हेडमास्तरांना बसायला देखणी खुर्ची आली; पण तिला असलेल्या अदृश्य काट्यांनी ते अस्वस्थ झाले.

मोठं टेबल आलं; पण ते अहवालाच्या कागदांनी गुदमरून गेलं. पोरांच्या अंगावर इंग्लिश धाटणीचे ड्रेस आले. शाळेला कंपाउंड आलं आणि गाव शाळेपासून दुरावत चाललं.

आता गावाचं गुरुजींवाचून काही अडत नाही. वरून अफाट अनुदान येतं. शाळेत पैसा आला: त्यामागं राजकारण आलं. राजकारणामागं गाव आलं. गावपुढारी शाळेत लक्ष घालू लागले. आठवीपर्यंत कुणाला नापास करायचं नाही... मुलांना मारलं तर गुरुजींना तुरुंगात टाकण्याच्या धमक्या सुरू झाल्या. धाक, दरारा, भीती नष्ट झाली. आनंददायी'च्या नावाखाली जणू स्वैराचारच सुरू झाला.कृतीपेक्षा प्रशिक्षणं जास्त झाली. गुणवत्तेपेक्षा मूल्यमापनाची साधनं जास्त झाली, शिक्षकांपेक्षा शिक्षणतज्ज्ञ जास्त झाले. सारं काही जास्त झालं; पण नेमकं काहीतरी कमी असल्याचं जाणवू लागलं...

साऱ्या सुविधा असूनही शिक्षणव्यवस्थेत रितेपणा असल्याची भावना दाटून आली आहे... भरल्या घरात एकटेपणा वाटावा तशी.

काय ते समजत नाही; पण माझं काहीतरी हरवलंय...!

धन्यवाद

# आनंद या आध्यात्मिक चळवळीचे संस्थापक

लोकनेता न्यूज नेटवर्क

वयाच्या २२व्या वर्षी वॉल्टर्स योगानंदांना भेटले, त्यांचे शिष्य बनले. नंतर १९५२मध्ये गुरू योगानंदाचे निधन झाल्यानंतर त्यांनी सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप- एसआरएफ आश्रमात सेवा सुरू ठेवली. सन १९५५मध्ये वॉल्टर्स यांना संन्यासाची शपथ देण्यात आली आणि सरोलानंद, बिमलानंद आणि भक्तानंद यांच्यासह दया माता, तत्कालीन एसआरएफ अध्यक्षांनी एसआरएफ ऑर्डरचा भाऊ म्हणून नियुक्त केले आणि त्यांना क्रियानंद हे नाव देण्यात आले. सन १९६०मध्ये एम.डब्ल्यू.लुईसचे निधन झाल्यावर एसआरएफ संचालक मंडळाने क्रियानंद यांची संचालक मंडळावर आणि अखेरीस उपाध्यक्षपदी निवड केली. सन १९६२मध्ये संचालक मंडळाने त्यांना एसआरएफमधून काढून टाकण्यासाठी एकमताने मतदान केले आणि त्यांच्या राजीनाम्याची विनंती केली. क्रियानंद यांनी योगानंदांच्या जागतिक बंधुता वसाहतींच्या आदर्शावर आधारित आनंद या धार्मिक आणि सांप्रदायिक संघटनांची जागतिक चळवळ स्थापन केली. क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स यांचा जन्म दि.१९ मे १९२६ रोजी टेलीजेन, रोमानिया येथे अमेरिकन पालक रे.पी. आणि गर्ट्रूड जी वॉल्टर्स यांच्या घरी झाला. त्यांचे वडील एस्सो कॉर्पोरेशनमध्ये तेल भूगर्भशास्त्रज्ञ होते, ज्यांना नंतर रोमानियन तेलक्षेत्रात नियुक्त केले गेले. रोमानिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि युनायटेड स्टेट्समध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण घेतले. त्याने हेव्हरफोर्ड कॉलेज आणि ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेतले, नंतर त्यांच्या वरिष्ठ वर्षात सोडले. त्यानंतर स्टेजक्राफ्टचा अभ्यास करण्यासाठी ते दक्षिण कॅरोलिनाला गेले. तेथे गेल्यानंतर वॉल्टर्सने भगवद्गीता वाचली आणि नंतर योगानंद यांचे योगींचे आत्मचरित्र वाचले. वॉल्टर्सच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यूयॉर्क शहरातील पुस्तकांच्या दुकानात आत्मचरित्र सापडले आणि त्यामुळे त्यांचे जीवन बदलले.

# भोकरदन येथे खासदार डॉ.कल्याण काळे यांचा महाविकासआघाडीच्या वतीने जंगी सत्कार सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राम शिंदे । दानापुर**





नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकिमध्ये जालना लोकसभा मतदारसंघातुन महाविकासआघाडीचे नवनिर्वाचित खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या विक्रमी विजयानंतर सत्कार सोहळे सुरु झाले आहेत. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचा डॉ. कल्याण काळे यांनी दारून पराभव करत दिमाखात संसदेत पाऊल ठेवले. या विक्रमी यशानंतर खासदार काळे यांचे सत्कार सोहळे सर्वत्र सुरु झाले आहेत. भोकरदन महाविकास आघाडीच्या वतीने दि. १५ जुन रोजी श्रीकृष्ण मंगल कार्यालय भोकरदन येथे मतदारांचे आभार मानण्याकरिता व महाविकास आघाडीचे खासदार डॉ. कल्याण काळे यांना नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. तर शहरातील मा.आ. चंद्रकांत दानवे यांचे संपर्क कार्यालय ते श्रीकृष्ण मंगल कार्यालयापर्यंत त्यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली होती. ढोल ताशांच्या गजरात, डिजेच्या तालावर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते नाचताना दिसत होते. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर यावेळी फटाक्यांची अतिषबाजी सुद्धा करण्यात आली. या विजयी मिरवणुकिमध्ये खा. डॉ. कल्याण काळे, मा.आ. चंद्रकांत दानवे, राजाभाऊ देशमुख, माजी आमदार संतोष सांबरे, बबलु चौधरी, सुधाकर दानवे आदी मान्यवर खुल्या जीपमध्ये विराजमान होते. नागरी सत्कार सोहळ्यावेळी मा.आ. चंद्रकांत दानवे यांनी खासदार डॉ. कल्याण काळे यांचा सत्कार करत बोलतांना म्हणाले की, भोकरदन विधानसभा हा माजी खासदार दानवे यांचा स्थानिक मतदारसंघ असुन सुद्धा या मतदारसंघातुन खा.डॉ. काळे यांना ९६२ मतांचे मताधिक्य मिळालेले आहे. आपल्या हक्काचा प्रतिनिधी दिल्ली गेल्याचा अभिमान वाटतो. यामुळे सरकार दरबारी मंडळांचे विविध प्रश्नं सुटण्यासही मोठी मदत होणार आहे.

तसेच खासदार डॉ. कल्याण काळे यांनी महाविकासआघाडीच्या नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे तसेच मतदारांचे आभार व्यक्त करत कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. तसेच ते बोलतांना म्हणाले की, भोकरदन विधानसभेतील कार्यकर्त्यांनी कामाच्या संदर्भात कधीही संपर्क साधला तरी प्राधान्याने भोकरदन तालुक्यातील आणि जाफराबाद तालुक्यातील काम पूर्ण करण्याचे जबाबदारी माझी राहील कारण माजी खासदार दानवे यांच्या स्वतःच्या मतदारसंघात लीड देण्याचं काम या मतदारसंघातील बहाद्दर जनतेने केले आहे असे सांगितले तर यावेळी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी येणाऱ्या विधानसभेत महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल अशी ग्वाही दिली यावेळी राजाभाऊ देशमुख, माजी आमदार संतोष सांबरे, बबलू चौधरी, सुधाकर दानवे,शफिक शेठ पठाण, रमेश शेठ सपकाळ, त्र्यंबक पाबले, नवनाथ दौड,राहुल देशमुख, पत्रकार इमरान भाई, आदींनी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अंकुश जाधव यांनी केले तर आभार अशोक पवार यांनी मानले, यावेळी कार्यक्रमाला.आदींसह या सत्कार सोहळ्याला तालुक्यातील महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# कौठा बाजार पेठ कडकडीत बंद दरोडेखोराना तात्काळ अटक करण्याची गावकऱ्यांची मागणी

गावात राष्ट्रीय कृत्त बँक राहिली असती तर कदाचित हि घटना घडली नसती,गावात राष्ट्रीय कृत्त बँक नसल्याने व्यापाऱ्यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागतो,गावा पासून १२ किमी अंतरावर मुखेड येथे राष्ट्रीय बँक आहे,सदरील घटने मुळे रक्कम आणायची सुध्दा हिमंत होत नाही,जिव धोक्यात घालून रक्कम आणावी लागते,जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष दिल्यास व्यापार्याची अडचण होणार नाही,

**ज्ञानेश्वर वट्टमवार भुसार व्यापारी**





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । प्रतिनिधी**



कंधार तालुक्यातील कौठा येथील गजानन येरावार यांच्या घरावर पडलेल्या सशस्त्र दरोड्याच्या निषेधार्थ कौठा बाजार पेठ कडकडीत बंद पाळून घटनेचा व्यापाऱ्यांनी निषेध करून बंद पाळण्यात आले,कौठा येथे तात्काळ पोलीस चौकी स्थापना करा गावात राष्ट्रीय कृत्त बँक उपलब्ध करुन देण्यात यावी दरोडेखोराना तात्काळ अटक करण्याची मागणी व्यापारी गावकऱ्यांनी केली आहे.

कंधार तालुक्यातील कौठा येथील गजानन येरावार यांच्या घरावर दि.१५ जून रोजी पहाटेच्या सुमारास सहा जणांनी सशस्त्र दरोडा टाकून मोठा ऐवज पळवल्याची घटना घडली आहे, दरोडेखोरानी गँस कटरच्या सह्यानी मुख्य दरवाजा तोडून घरातील मौल्यवान वस्तू पळवल्याची घटना घडली या घटनेच्या निषेधार्थ कौठा बाजारपेठ कडकडीत बंद ठेऊन व्यापाऱ्यांनी निषेध व्यक्त केला, पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांना निवेदन देऊन दरोडेखोराना तात्काळ अटक करण्याची मागणी व्यापारी व तसेच गावकऱ्यांनी केली,असता पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी आरोपींना अटक करण्या साठी विविध पथक तैनात करण्यात आली असून लवकर आरोपींना अटक केले,जाईल असे उपस्थित शिष्टमंडळास सांगितले.यावेळी राजेश पावडे ज्ञानेश्वर वट्टमवार सतिश देशमुख संतोष मोरलवार ज्ञानेश्वर कोत्तावार प्रफुल्ल येरावार साईनाथ महाजन पांडुरंग ओगले रुपेश येरावार आरेष चौधरी गोविंद महाजन बाबुराव येरावार महेश कोत्तावार भानुदास येरावार आदी उपस्थित होते.

# चैतन्य विद्यालयात विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पुस्तके देऊन जल्लोषात स्वागत


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**



ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात आज शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात आगमन झाले. या विद्यार्थ्यांचे अतिशय जल्लोषात स्वागत करण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापिका सौ.राजश्री भालेकर यांनी दिली.

आज संपूर्ण राज्यात प्राथमिक आणि माध्यमिक शाळा उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर सुरू झाल्या. नव्याने शाळेत येणारे विद्यार्थी आणि पालक यांच्या चेहऱ्यावर एक वेगळ्या प्रकारचे कुतूहल दिसून येत होते. चैतन्य विद्यालयात ढोल ताशांच्या गजरामध्ये विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी पण केली.संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे ,उपाध्यक्ष पुष्पवृष्टी पण केली. संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, सिताराम डुंबरे, शेखर डुंबरे, सचिन तांबे, संजय हिरे, अनिल उकिरडे, भाऊसाहेब खाडे, शरद माळवे, राजाराम शिंदे, विशाल चौधरी, आदी व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प ,खाऊ, आणि पुस्तकांचे वाटप करण्यात आले. पहिल्याच दिवशी मिळालेली नवीन पुस्तके आणि गुलाब पुष्प पाहून मुलांचे चेहरे आनंदाने ओसंडून वाहत होते. या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी भगवंत घोडे,एम. एम. तांबे, प्रमोद जाधव, बाळासाहेब साबळे, संतोष सोनवणे, देवचंद नेहे,अमित झरेकर, मिलिंद खेत्री, आसावरी गायकर, वनिता भोर, लक्ष्मण दुडे, सोनाली माळवे, सोनाली कांबळे, अनिल जवरे, दिनेश ताठे, अपेक्षा गोरे, आशा डुंबरे, अश्विनी नलावडे, आराधना इसकांडे, निर्मला डोंगरे, साक्षी देशमुख, सौरभ ढमाले, सुनील शितोळे, ईश्वर ढमाले, अरविंद आंबरे,विजय खरात, रामदास ठोसर, मयुर जाधव,प्रसन्न तांबे, तेजस ढमाले आदींनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे , प्रभाकर तांबे यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब खाडे यांनी तर अजित डांगे यांनी सूत्रसंचालन केले. शरद माळवे यांनी आभार मानले.



**आज लातूर जिल्ह्याचे नवनिर्वाचित खा.डॉ.शिवाजीराव काळगे यांनी श्री गुरु हावगिस्वामी मठाचे मठाधिपती ष.ब्र.प.१०८ शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचा आर्शिवाद घेतले.यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शैलेश उटगे, ता.अध्यक्ष कल्याण पाटील, लोकसभा निरीक्षक रविंद्र काळे,अँड.पद्माकर उगीले, कुणाल बागबंदे,श्रीकांत पाटील, अजित दायमी, गजानन सताळकर, ईश्वर समगे , विलास गताटे यांच्यासह असंख्य नेते,कार्यकर्ते उपस्थित होते.**

तुले खांद्यावर घेऊन
चवदा मैल जत्रंत आनो
पन् खांदे कही दुखले न्हाईत

आन् डोक्यावर घेऊन
तिथं उड्या मारू मारू नाचलो
पन् मानबी कही आवटाळ्ळी न्हाई

माय तुहं तोंड
पदरानं पुसायलं
मांघं मांघं पळे
पन् ती बी कही दमली न्हाई

आता बी आम्ही
त्याच जत्रंत हावोत
पन् त्या गल्लीत
तू येवू नको

काहून की
आता माय आंधळी
आन् मी लंगडा
तुले पाह्यल्या जानार न्हाई

आन् भीक बी
देल्या जानार न्हाई

पुन्हा पोरं इच्यारतील
ह्ये कोन.....? म्हनून
मंग काय सांगसीन.....?
तव्हा आमासिक
लांबूनंच जाय.....!
आम्ही खुशाल हावोत.....!!

हो पितृक दीनाच्या
तुले आन्
तुह्या लेकराबाळायले
आमचे आशिरवाद
भरले गाडे जात.....!!!

तुव्हा बाप...!!!!

**-डॉ. विजयकुमार कस्तुरे,**
**डव्होकेट, चिखली.**
**दि. १६-०६-२०२४.**
**आगऱ्याहून..**

# दावरवाडी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने कर्ज वाटप मेळावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पैठण । प्रतिनिधी**



आज दावरवाडी येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज वाटप मेळावा घेण्यात आला दिं.१५ जून २०२४ रोजी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने दावरवाडी येथे कर्ज वाटप व कर्ज वसुली मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते सभासदांना चालू खरीप हंगामात वेळेवर कर्ज उपलब्ध व्हावे अशा सुचना महाराष्ट्र शासनाने जिल्हा अधिकारी यांच्या मार्फत सर्व बँकांना दिलेल्या आहेत त्या आनुषंगाने सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले .

औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पैठण तालूक्यातील एकूण १५ शाखे अंतर्गत ३९०९ सभासदांना खरीप कर्ज वाटप रू २८ कोटी ६२ लाख रु.वाटप करण्यात येणार आहे या मध्ये मागील वर्षी उचल केलेले कर्ज या हंगामात परत फेड केलेल्या सभासंदाना १० % वाढीव कर्ज वाटप पण करण्यात आलेले आहे तसेच रब्बी हंगामात ७७५१ सभासदांना रू ४० कोटी ६२ लाख रु कर्ज वाटप करण्यात आले आहे .असे एकूण चालू हंगामात ११६६० सभासदांना ६९ कोटी २४ लाख ७८ हजार ऐवढे कर्ज वाटप करण्यात आले आहे . जास्तीत जास्त सभासंदानी या योजनेचा लाभ घ्यावा अशी विनंती पैठण तालुका लोन ऑफिसर शाम तांगडे यांनी मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते व गावातील शेतकरी रावसाहेब अण्णा तांगडे यांना कर्ज वाटप चेक यावेळी देण्यात आला या कार्यक्रमास तालुका अकाउंट ऑफिसर लिपाने संस्थेचे चेअरमन राजेंद्र वाघमोडे व्हा.चेअरमन अरविंद तांगडे संचालक बि टी तांगडे , मोहनराव जगताप , बँकइंस्पेक्टर भांडुरे , दळे , खंडागळे , खरग , जमधडे , अक्षय शिंदे या वेळी गावातील नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.

# विद्यामंदिर हायस्कूल एखतपुरमध्ये नवोगत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

दिनांक १५ जून रोजी शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांचं स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले ,याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक आर डी माने सर यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता शिंदे ,मोहन तुपे ,सौ मनीषा खांडेकर प्रियांका इंगोले आकाश इंगोले यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक विवेक घाडगे सर यांनी केले .आयुष्यातल्या पहिल्या क्षणाचे महत्व काय असते हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले ,अध्यक्ष स्थानावरून बोलताना आर डी माने सर यांनी शाळा म्हणजे एक कुटुंब असते .आज आमच्या विद्यामंदिर परिवारामध्ये नवीन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनापासून स्वागत करतो. नवीन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना जुन्या विद्यार्थ्यांनी समजून घ्यावे त्यांच्याशी मैत्री करावी व गुण्यागोविंदाने ज्ञानार्जन करावे असे मार्गदर्शन केले .या स्वागत समारंभात नवीन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व चॉकलेट पुस्तके देऊन त्यांचं स्वागत करण्यात आलं .याप्रसंगी कांबळे सर, कोळी सर ,महिमकर सर ,साळुंखे मॅडम ,नदाफ मॅडम, सगरे मॅडम, याच्या सर्वांच्या हस्ते विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आलं .

# गौरव गुणवंतांचा सोहळा आनंदाचा कार्यक्रमात हर्षवर्धन पाटील यांनी केला विद्यार्थ्यांचा सन्मान






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील विद्यार्थी जिद्दी असून, ध्येयपूर्ती साठी मेहनत घेत आहेत. तालुक्यातील विद्यार्थ्यांची विविध स्पर्धा परीक्षांमधून होणारी निवड तसेच इ.१० वी आणि १२ वी. मधील गुणवंत विद्यार्थ्यांची झालेली वाढ तसेच नीट, सीईटी आदी परीक्षांमधील यशाचा चढता आलेख पाहता, इंदापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ कौतुकास्पद असल्याचे गौरवोदगार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर येथे रविवारी (दि.१६) रोजी काढले.

इंदापूर येथे वाघ पॅलेस मध्ये इंदापूर तालुक्यातील इ.१० वी आणि १२ वी.मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि १०० % निकाल लागलेल्या शाळांचा तसेच विविध स्पर्धा परीक्षातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान वनगळी, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आणि श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी बावडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शानदार कार्यक्रमामध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. सदर प्रसंगी मार्गदर्शन करताना हर्षवर्धन पाटील बोलत होते.

ते पुढे म्हणाले, इंदापूर तालुक्यामध्ये सन १९५२ मध्ये ज्येष्ठ नेते शंकररावजी पाटील उर्फ भाऊंनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज या तिन्ही संस्थांमध्ये सुमारे ३५ हजार विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे, प्रोत्साहन देण्याचे व विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून शिक्षणाची दारे खुली करण्याचे काम केले जात आहे.

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण आवश्यक आहे. जिवनामध्ये संस्कार मूल्ये निर्माण करून व्यक्तिमत्व विकास घडवण्याचे काम शिक्षण करीत आहे. यशस्वी जिवन जगण्याचे ज्ञान शिक्षणातूनच मिळत आहे. पालकांनीही मुलांचा कल व आवड तसेच बुद्धिमत्ता लक्षात घेऊन, त्यांच्या शिक्षणाच्या शाखा निवडल्या पाहिजेत. इंदापूर तालुक्यातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होत आहेत. या स्पर्धा परीक्षांसाठी शिक्षण संस्थांच्या मार्फत सहकार्य केले जात असून, इंदापूर येथे रात्रीची अभ्यासिका सुरू केली जात आहे. अशी माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.या शानदार सोहळ्यात इंदापूर तालुक्यातील १०१ माध्यमिक शाळा व ४७ जुनियर कॉलेज पहिल्या तीन क्रमांकाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा त्याचबरोबर विविध स्पर्धा परीक्षांमधून निवड झालेल्या युवक विद्यार्थ्यांचा माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अँड.मनोहर चौधरी यांनी केले.याप्रसंगी शिक्षणाधिकारी अनिल गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास इंदापूर तालुक्यातील पदाधिकारी,विद्यार्थी,पालक,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन अमर निलाखे आणि नितीन भोसले यांनी केले.

### सेनगाव ता,कवठा गावाकडच्या

## रस्त्यावरील पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे-सामाजिक कार्यकर्ते बंडू कोकाटे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगाव तालुक्यातील कवठा कोंडवाडा कापडसिंगी या रस्त्यावरील कयाधू नदी च्या पात्रावर होत असलेल्या पूलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने तात्काळ शासनाच्या कर्मचाऱ्यांनी पाहणी करून निकृष्ट दर्जाचे होत असलेले काम थांबवून गुत्तेदार व ठेकेदारांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी कवठा गावातील रहिवासी असलेले बंडू कोकाटे यांनी केली आहे गेल्या अनेक वर्षापासून कयाधू नदीवरील पूलाची मागणी केली जात होती, नवीन पुल होत असून या फुलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे या पुलावरून अनेक गावांना जाणारा रस्ता असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते निकृष्ट दर्जाचा पूल झाल्याने लवकरच या पूलाची दूरअवस्था होण्याची शक्यता आहे म्हणून तात्काळ शासनाच्या कर्मचाऱ्यांनी या फुलाची पाहणी करून ठेकेदार व गुत्तेदारांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

## पावसाळी अधिवेशनात कृषिधन (पाळीव प्राणी) अपघात विमा योजना सुरू करा-मारोती गीते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



शेतकऱ्यांसोबत शेतातमध्ये राबणारे पाळीव प्राणी यांना पावसाळी अधिवेशनामध्ये अपघात विमा योजना सुरू करावी शेतकऱ्यांसोबत शेतात राबणारे व कृषी उन्नती व उत्पादन मोलाची भूमिका बजावणाऱ्या पाळीव प्राणी बैल ,गाय , म्हैस ,बकरी, मेंढी, गाढव, कुत्रा, व घोडा, यांचा अपघात, अकास्मिक, नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या मालकांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळत नसून पावसाळ्याच्या हंगामात अनेक जनावरांचा सर्पदंशाने किंवा शेतात काम करताना मृत्यू किंवा अपघात वीज पडणे पुरामध्ये वाहून जाणे विंचूदंश, विजेचा शॉक बसणे अगदी आपत्ती मुळे होणारे अपघात रस्त्यावरील अपघात वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे अपघात झाल्यास शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी येणाऱ्या पावसाळी अधिवेशनामध्ये पाळीव प्राणी अपघात विमा योजना सुरू करावी , जेणेकरून शेतकऱ्याचे होत असलेल्या नुकसानीस मदत होईल,

## मुंडे समर्थकाच्या आत्महत्याचे सत्र सुरूच हरिभाऊ बडे यांची आत्महत्या पंकजाताई यांची अंत्यविधीस उपस्थिती

### पंकजाताई भावुक अश्रू अनावर आत्महत्या थांबवा अन्यथा राजकारण सोडून देईन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

लोकसभा निवडणुकीत पंकजताई मुंडे यांचा पराभव झाल्यानंतर बीड जिल्ह्यामध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती,पंकजाताई मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने त्यांच्या समर्थकांनी आत्महत्या केल्याच्या घटना वाढत जात आहेत . आज शिरूर तालुक्यातील वारणी येथील हरिभाऊ बडे या मुंडे समर्थक यांनी आत्महत्या केली असे समजताच पंकजा ताई मुंडे बडे कुटुंबासमवेत अंत्यविधी स उपस्थित होत्या पंकजाताई मुंडे यांनी आत्महत्या केलेल्या मुंडे समर्थक यांच्या भेटी घेत आत्महत्या करू नका असे हात जोडून विनवणी करत आहेत . यावेळी मृतांच्या कुटुंबियांना पाहून पंकजाताई मुंडे यांनाही अश्रु अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. लोकसभा निवडणुकीमध्ये पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाल्यानंतर बीड जिल्ह्यात आत्महत्यांचे सत्र सुरू झाले आहे. पंकजाताई मुंडे यांच्या पराभवानंतर बीडच्या आष्टी तालुक्यातील इंदेवाडी आणि डिघोळआंबा येथील तरुणाने आत्महत्या केली होती. या आत्महत्याग्रस्त कुटुंबांची पंकजाताई मुंडे यांनी आज भेट घेतली.

यातील चिंचेवाडी येथील वायबसे कुटुंबाला भेत घेत मुंडेंनी त्यांचे सांत्वन केले. यावेळी पंकजाताई मुंडे यांना पाहताच कुटुंबियांनी टाहो फोटला. तर पंकजाताई मुंडे यांनाही अश्रु अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना आता आत्महत्या करू नका, तर मला लढण्यासाठी बळ द्या, असे समर्थकांना आवाहन केले आहे.जर आत्महत्तेचे सत्र सुरु राहिले तर राजकारनातून बाहेर पडेल तुमच्या जिवापेक्षा राजकारण मला मोठं नाही तुमच्या मुलाचा आई वडिलांचा विचार करा बाळांनो राजकारण जय पराजय होत असतो या टोकाचे पाऊल कोणीही उचलू नये अशी हात जोडून विनंती.

## भोकरदन तालुका आभार दौरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राम शिंदे । दानापुर**



देशाचे आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी अणि भाजप-महायुतीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री मा.श्री.रावसाहेब पाटील दानवे दादा यांच्यावर विश्वास ठेवून अमूल्य मतदान करणाऱ्या भोकरदन तालुका व शहरातील मतदारांचे आज आभार मानले.

यावेळी उपस्थित सर्वांशी संवाद साधला. भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता हा एखाद्या अपयशाने खचणारा नसून तर परत जोमाने लढणार आहे. त्यामुळे आगामी काळात याच प्रामाणिक आणि एकनिष्ठ कार्यकर्त्यांच्या जोरावर आपण विजयश्री खेचून आणू याबाबत माझ्या मनात कुठलीही शंका नाही.भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी या नात्याने मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी व कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या सुखदुःखात दानवे परिवार सदैव तत्पर राहील अशी ग्वाही यावेळी दिली.याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री मा.श्री.रावसाहेब पाटील दानवे दादा यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने मतदार बंधू-भगिनी उपस्थिती होती.

## बार्टीच्या तज्ञ समितीवर प्रा.रमेश लांडगे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनील वारे यांच्या आदेशाने वस्ताद लहुजी साळवे मातंग समाज आयोग अभ्यास व कृती अहवाल समिती सदस्य पदी प्रा.रमेश लांडगे यांची निवड नुकतीच करण्यात आली आहे.महाराष्ट्र शासनाने मातंग समाजाच्या विकासासाठी गठीत केलेल्या लहुजी साळवे मातंग समाज आयोगाने दिलेल्या ८२ शिफारशी पैकी ६८ शिफारशी या तत्त्वतः मान्य करण्यात आल्या आहेत.या शिफारशीची अंमलबजावणी शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्याच्या उद्देशाने ही अभ्यास व कृती अहवाल समिती तयार करण्यात आली आहे.या समिती साठी तज्ञ सदस्य म्हणून कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार येथील इंग्रजी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा डॉ.रमेश लांडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.रमेश लांडगे यांनी मातंग समाजाचे सांस्कृतिक,सामाजिक आणि शैक्षणिक उद्बोधन व्हावे या उद्देशाने अण्णाभाऊ साठे राज्यस्तरी साहित्य संमेलन, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित केल्या आहेत.कोविड काळात फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून महाराष्ट्रातील घराघरात अण्णाभाऊंचा विचार पोहोचविला.तसेच अण्णाभाऊ साठे यांची वैजयंता आणि चित्रा ही कादंबरी इंग्रजी भाषेत भाषांतरित केली आहे.प्रा रमेश लांडगे एक अभ्यासू आणि सामाजिक जाणीव असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.त्यांच्या या निवडीमुळे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोपानराव जोगदंड,प्रबोधनकार कवीवर्य महादेव लांडगे,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते जालिंदर गायकवाड (नेताजी),प्रा.आंबादास शिरावळे, पुरोगामी पत्रकार संघ तालुका अध्यक्ष अण्णासाहेब साबळे आष्टी यांच्या तर्फे व समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.


हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904